# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांची महानगरपालिका अभ्यासिकेस अनपेक्षित भेट**

दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती कार्यालय ३ येथील अभ्यासिकेस मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी अनपेक्षित भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. प्रसंगी अति. आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त रवि पवार, सहा. आयुक्त जितेंद्र कांबळे व महापालिका अधिकारी उपस्थित होते.

अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अभ्यासिका आवश्यकतेनुसार वातानुकूलित ठेवण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. अभ्यासिका पाहणी करताना मा. आयुक्त यांनी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अभ्यासिका व्यवस्थाबाबत विद्यार्थ्यांची विचारणा केली. तसेच अभ्यास करणारे बरेचसे विद्यार्थी हे इंजिनियर, मेडिकल, राज्य सेवा परीक्षा MPSC अश्या अनेक स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी अभ्यासिकेत अभ्यास करण्याकरिता येत असतात. अभ्यासिकेची व तेथील शौचालयाची स्वच्छता नियमित होते की नाही याबाबत आयुक्त यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली. अभ्यासिकेतील साफसफाई व शौचालयाची स्वच्छता नियमित ठेवण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सबंधित विभागास दिले.